शाळा मान्यतेचे ओदश

क्र.भंजिप /शिक्षण /प्राथ/डे-29/ 1855 /2020
कार्यालय शिक्षण विभाग (प्राथ) जि.प. भंडारा.
दिनांक :- 2/6/2021

व्यवस्थापक :- महर्षी शिक्षण संस्था

विषय :- बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ याच्या नियम ११, पोट नियम (४) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देण्याबाबत.

माननीय महोदय/महोदया,

आपल्या दिनांक 24.5.2021 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार/शाळेची केलेली तपासणी याआधरे.

मी मनोहर बारस्कर दिनांक 9.5.2019 पासून दिनांक 30.4.22 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता 9 ते इयत्ता ८ करीता महर्षी विद्यामंदीर अशोकनगर, न.जि. भंडारा. शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

वरील मान्यता ही खाली शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन आहे :-

१) मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसले.

२) बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम २००९ (जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) मधील तरतूदीचे , शाळा , पालन करील.

३) शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचीत गटातील बालकांना , पहिल्या इयत्तेत विद्यार्थी संख्येच्या किमान २५ टक्के मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्रारंभिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्रार्थामक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

४) परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरीता शाळेला अधिनियमाच्या कलम १२ (२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बँक खाते देण्यात येईल.

५) संस्था /शाळा कोणतीही कॅपीटेशन फी वसुल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पदधीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या माता पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही .

६) कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी , धर्म, जात किंवा वंश , जन्म ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव शाळेमध्ये प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

७) (१) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखुन ठेवले जाणार नाही . किंवा प्रारंभीक शिक्षण पुर्ण होईपर्यंत शाळेतून काढुन टाकण्यात येणार नाही.

(२) कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(३) कोणत्याही बालकास प्रारंभिक शिक्षण पुर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(४) प्रारंभिक पुर्ण केलेल्या प्रत्येक बालकास नियम २३ अन्वये निर्धारीत केलेले प्रमाणपत्र देण्यात येईल.

(५) विकलांग /विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतूदीनुसार समावेश करण्यात येईल.

(६) अधिनियमाच्या कलम २३ (१) अन्वये निर्धारीत केलेली किमान अर्हता धारण करणा-या शिक्षकाची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणा-या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षांच्या कालावधीत संपादीत करावी लागेल.

(७) अधिनियमाच्या कलम २४ (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची /तीची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील . आणि

(८) शिक्षकाने /शिक्षीकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंणतवूण घेवू नये याची सुनिश्चीती शाळा करील.

८) शाळा समुचीत प्राधिकरणाने निर्धारीत केलेल्या अभ्यास क्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठयक्रमाचे पालन करील

९) शाळा , अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

१०) शाळा अधिनियमाच्या कलम १९ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील . मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या.

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ 9५६ee.२४ चौ.मी.
- एकुण बांधकाम क्षेत्र ९८४२. चौ. मी.
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ ९२६ee.२४ चौ.मी.
- वर्गखोल्याची संख्या ६०
- कार्यालय- नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली ०८
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधान गृहे - जेथे वापरण्यासाठी व प्रसाधन गृहे स्वच्छ आणि आरोग्य दायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल . आहे
- पिण्याच्या पाण्याची सुविधा आहे
- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाक घर लागू नाही
- अध्यापन , अध्ययन साहित्य / खेळ व क्रिडा विषयक सामग्री /ग्रथांलय यांची उपलब्धता आहे
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध.

११) मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकडया , शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

१२) शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रिडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

१३) शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम १८६० ( १८६० चा २१ ) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चाविण्यात येत आहे.

१४) शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरीता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चाविण्यात येत नाही.

१५) शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षीत व प्रमाणीत करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिका-यांकडे पाठवण्यात यावी.

१६) तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक २७१००११०६०४ असा आहे, हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

१७) शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामाकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

१८) संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चीती करावी.

१९) जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

* RTE २००९ नुसार शाळेत भौतिक सुविधा ग. शि. अ. यांचे शिफारसी वरुन पूर्ण असल्याचे अधीन राहून मान्यता देण्यात येते.

शिक्षणाधिकारी (प्राथ)
जिल्हा परिषद, भंडारा.